महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, १९७८ स्पष्टीकरणाबाबत

CR1980101401

महाराष्ट्र शासन,
वित्त विभाग,
परिपत्रक क्रमांक पीसीआर १३८०/सीआर-२९९-एसईआर-१०
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १४ ऑक्टोबर १९८०.

## परिपत्रक

जे शासकीय कर्मचारी ३१-३-१९७६ रोजी किंवा त्यापूर्वी शासकीय सेवेतून निवृत्त झाले व ज्यांना त्या तारखेला पुन्हा सेवेत घेतलेले होते व ज्यांचा पुन्हा सेवेत घेण्याचा कालावधी उपरोक्त तारखेनंतरही वाढविण्यात आला, अशा शासकीय कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, १९७८ लागू नाहीत. परंतु जे शासकीय कर्मचारी रुग्णता किंवा भरपाई निवृत्तिवेतन/उपदान घेऊन सेवानिवृत्त झालेले आहेत व जे मुंबई नागरी सेवा नियम ३२८ व ३२९ प्रमाणे १-४-१९७६ पूर्वी पुन्हा सेवेत घेतले होते व जे त्या तारखेला सेवेत होते अशा शासकीय कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, १९७८ या सुधारित वेतनाचा फायदा देण्याबाबतचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. शासनाने आता असा निर्णय घेतला आहे की, जे शासकीय कर्मचारी रुग्णता किंवा भरपाई निवृत्तिवेतन/ उपदान घेऊन सेवानिवृत्त झालेले आहेत व जे मुंबई नागरी सेवा नियम ३२८ व ३२९ मध्ये नमूद केलेल्या शर्तींवर १-४-१९७६ पूर्वीपासून पुन्हा सेवेत घेतले होते व जे त्या तारखेला सेवेत होते अशा कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, १९७८ च्या सुधारित वेतनाचा फायदा देण्यास पात्र धरण्यात यावे.

२. या शासन परिपत्रकाची इंग्रजी प्रत सोबत जोडण्यात आली आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सरला पंडित,
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत रवाना :-

महालेखापाल, महाराष्ट्र १, मुंबई,
महालेखापाल, महाराष्ट्र २, नागपूर,
लेखा व अधिदान अधिकारी, मुंबई,
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी हिशेब, मुंबई,
उपमुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी हिशेब, मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद,
निवासी लेखा अधिकारी, मुंबई,
राज्यपालांचे सचिव,

कृ. मा. प.

शामुमु. रोटा/वि. वि. -एच-६४५(८०००+५-१०-८०).

---- मुख्य मंत्र्यांचे सचिव,
मंत्री आणि राज्य मंत्री यांचे स्वीय सहाय्यक,
* प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई,
* प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
* प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
मंत्रालयातील सर्व विभाग,
मंत्रालयाच्या सर्व विभागातील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख
लेखा अधिकारी, वेतन पडताळणी पथक, मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद,
जनसंपर्क अधिकारी, मंत्रालय, मुंबई,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
वित्त विभागातील कार्यासने, एसईआर-४, एसईआर-८,
निवड फाईल, वित्त विभाग, एसईआर-१०.

* पत्राद्वारे.

१९८० चा क्रमांक **के.१/१२२९** **दिनांक ३१-१०-८०**

माहिती व मार्गदर्शनाकरिता प्रत रवाना. **सर्व उपसंचालक भूमि अभिलेख यांना प्रतिसह**

-----

**जमाबंदी आयुक्त आणि संचालक,**
**भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे**
**यांचे करिता.**

**प्रत:- कार्यासन अधिकारी के.२.३.ई १.२.३.४.५. अभिलेखापाल.**

K.W.Pe
SAS 2/12
for S.C.O.D.L.R.M.S. Pune